# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३**

## महिला व बालविकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १६**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एक्स-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ८,३४,८४,५७,०००/-**<br>**श्रीमती सुलभा खोडके** |
| (१) | ५१३५ | १० | अमरावती महानगरपालिका क्षेत्रात अंगणवाडी सेविकांची ८ पदे व मदतनीसांची ९२ पदे रिक्त असणे, सदरची रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (२) | ५१४३ | १० | महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यांमध्ये पर्यवेक्षिका आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची पद मोठ्या प्रमाणात रिक्त असल्यामुळे महिला बाल विकास विभागांच्या योजना प्रभावीपणे राबविण्यात मध्ये मोठ्या प्रमाणात अडचण येत आहे ही पदे लवकरात लवकर भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. चेतन तुपे** |
| (३) | ५०५३ | १० | राज्यातील महानगरपालिकांमध्ये विशेषतः पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट लगतच्या ग्रामीण भागातील अंगणवाडी इमारती इत्यादी मालमत्तांचे आणि कर्मचाऱ्यांचे हस्तांतरण महापालिकेकडे तातडीने होत नसल्याने शाळा इमारतींची सुरक्षा आणि देखभाल तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पदोन्नती रिक्त जागांवर नेमणुका इत्यादी बाबत निर्माण झालेल्या समस्या, परिणामी कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेली अनिश्चिततेची भावना,या संदर्भात सर्वंकष धोरण निश्चित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (४) | ५०७३ | १०० | जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यासाठी महिला व बालकल्याण भवन बांधकाम करणेसाठी निधि उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करवयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (५) | ५०३६ | १०० | बीड शहर हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने या ठिकाणी जिल्हा भरातून येणाऱ्या महिला व बालकांना सर्व सुविधायुक्त निवारा मिळावा त्याचबरोबर महिला व बालविकास विभागाचे शासकीय कामकाज एकाच इमारतीत व्हावे यादृष्टीने महिला व बालभवन उभारले जावे याबाबत बीड जिल्हा नियोजन समितीने ठराव संमत केलेला असणे, सदर भवन उभारण्यासाठी जागा उपलब्ध असल्याबाबतचे सर्वेक्षण पूर्ण झालेले असणे, सदर महिला व बाल भवन तातडीने उभारण्यात यावे, यासाठी जागा निश्चित करून निधी मंजूर करण्याबाबत होत असलेली मागणी, शासनाने त्यावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (६) | ५०४२ | १० | विदर्भात बालगृहातील मुलींसाठी सध्या एकही अनुरक्षण गृह नसल्यामुळे 18 वर्षे पुर्ण झालेल्या मुलींना बालगृहातून शासनाच्या इतर संस्थांमध्ये (स्वाधार, नारीनिकेतन) येथे हलविले जात असणे , बालगृहात मुली अल्पवयीन असताना एका संरक्षित वातावरणात शिक्षण घेत असताना मात्र 18 वर्षे पुर्ण झाल्यानंतर त्यांना अचानक वेगळया वातावरणात हलविले जात असल्यामुळे त्यांच्या मनावर वाईट परिणाम होत असणे, शासनाने याप्रकरणी निर्णय घेऊन विदर्भात प्रत्येक जिल्ह्यात बालसुधार गृहातील मुलींसाठी हक्काचे अनुरक्षण गृह तातडीने तयार करण्याबाबतची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. |
| (७) | ५०६२ | १० | राज्य शासनामार्फत ० ते १८ वयोगटातील अनाथ , निराश्रित , बेघर व अन्य प्रकारे आपत्तीत असलेले बालकांचे संस्थाबाह्य आणि कौटुंबिक वातावरणात संगोपन व्हावे या दृष्टीने बाल संगोपन योजना राबवण्यात येत असून अमरावती जिल्ह्यातील या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांचें अनुदान अद्यापपर्यंत मिळाले नसणे ,अमरावती जिल्ह्यातील जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात मनुष्यबळ कमी असल्याने मोठ्या प्रमाणात जिल्ह्यातील प्रकरणे प्रलंबीत असणे, प्रलंबीत प्रकरणे मार्गी लावून अमरावती जिल्ह्यातली पात्र लाभार्थ्यांना प्रलंबीत अनुदान अदा करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाहि व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एक्स-१** |
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: २२३६, पोषण आहार** |
| | | | **रूपये:- ३८,७१,८८,३३,०००/-** |
| | | | **श्री. चेतन तुपे** |
| (८) | ५०५० | १० | वेतनवाढ,सेवाविषयक अत्यावश्यक सुविधा आणि इतर दीर्घकालीन प्रलंबित रास्त मागण्यांच्या पूर्ततेसाठी राज्यभरातील अंगणवाडी सेविका आणि सहायिकांनी फेब्रुवारी 2023 मध्ये पुकारलेले आंदोलन,केवळ जुजबी वाढ मान्य करणे, त्यामुळे ह्या अत्यावश्यक महत्त्वाच्या सेवेत दिवस-रात्र राबणाऱ्या राज्यभरातील कर्मचारी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | माता-भगिनींमध्ये निर्माण झालेली तीव्र असंतोषाची,भावना या सर्व कर्मचाऱ्यांना भरीव वेतन वाढ आणि आवश्यक सेवा विषयक सुविधा देण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (९) | ५०७८ | १०० | जळगाव जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना गेल्या पाच वर्षांपासून देण्यात आलेले मोबाईल कमी क्षमतेचे असून निकृष्ट दर्जाचे आहेत त्यामुळे जळगाव जिल्ह्यातील चोपडा येथील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी मोबाईल वापसी आंदोलन करून मोबाईल शासनाला परत केले सदर निकृष्ट दर्जाचे मोबाईल पुरवठा करणाऱ्या कंत्रांत दारावर शासनाने करावयाची कारवाई व अंगणवाडी कर्मचाऱ्यांना चांगल्या दर्जाचे मोबाईल देणे बाबत घ्यावयाचा निर्णय, निकृष्ट मोबाइल पुरविणाऱ्या कंत्राटदारवर करवायची कारवाई. |
| (१०) | ५०८२ | १०० | राज्यात दोन लाख अंगणवाडी कर्मचारी असून त्यापैकी अंगणवाडी सेविकांना राज्य शासनाने 2023-24 च्या अर्थसंकल्पात अत्यंत कमी वेतन वाढ जाहीर केली असणे,सध्याच्या वाढत्या महागाईनुसार मानधनात भरीव वाढ करून किमान वेतन देण्याची गरज, अंगणवाडी केंद्राची भाडयाची थकीत रक्कम, मोबाईल रिचार्ज व सीबीयोजनेची थकीत रक्कम यासह अन्य विविध मागण्यांबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ५०८६ | १०० | ठाणे, पालघर आणि रायगड अशा कोकण विभागात गेल्या आठ महिन्यांत तब्बल 3 हजार 226 बालके तीव्र कुपोषीत तर 32 हजार 535 बालके मध्यम कुपोषित असल्याचे आरोग्य विभागाच्या अहवालाद्वारे निदर्शनास येणे, एकात्मिक बाल सेवा योजनेअंतर्गत ठाणे जिल्ह्यात 1854 अंगणवाडी केंद्र असून यामध्ये 1 लाखांहून अधिक बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण दिले जाने, पालघर जिल्ह्यातील जव्हार वाडा, मोखाडा, तलासरीपाठोपाठ आता वसईमध्येदेखील कुपोषित बालके असल्याचे आढळण्यात आले असून या परिसरात गरोदर महिलांना पोषक आहाराचा अभाव असल्याने कमी वजनाचे बाळ जन्माला येते, मूल जन्मल्यानंतरही आईचे पुरेसे दूध व पोषण आहार न मिळाल्याने कुपोषण वाढत असल्याचे निदर्शनास आले येणे, कोकण विभागातील सर्वाधिक बालके ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात असून 1141 तीव्र कुपोषित बालकांपैकी 631 तीव्र कुपोषित बालके ही एकट्या शहापूर तालूक्यात तर पालघर जिल्ह्यात एकूण 1405 तीव्र कुपोषित बालकांपैकी जव्हारमध्ये 424 आणि रायगड जिल्ह्यातील कर्जतमध्ये 171 सर्वाधिक कुपोषित बालके असल्याचे सदर अहवालाधिन आकडेवारीवरुन समोर येणे कुपोषण व बालमृत्यू रोखण्याचे दृष्टीने शासन स्तरावर करावयाच्या उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (१२) | ५०३५ | १०० | वर्ग पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दिले जाणारे मध्यान्ह भोजन शिजवणे व अन्य तत्सम कामांसाठी नेमण्यात आलेल्या स्वयंपाकी व मदतनीस यांना प्रतिमाहिना केवळ 1500 मानधन दिले जात असणे, या मानधनात प्रतिमहिना 10 हजार रुपये इतकी वाढ करण्याची महाराष्ट्र शालेय पोषण आहार कामगार संघटनेची मागणी असणे, केवळ 1500 रुपयात अन्न शिजवणे व अन्य तत्सम कामे करवून घेणे हे अन्यायकारक असणे व त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना प्रतिमहिना किमान 10 हजार रुपये इतके मानधन देण्याची होत असलेली मागणी, त्यावर करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ५०८० | १०० | कर्मचाऱ्यांना गेल्या पाच वर्षांपासून देण्यात आलेले मोबाईल कमी क्षमतेचे असून निकृष्ट दर्जाचे असणे व त्यामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी मोबाईल वापसी आंदोलन करून मोबाईल शासनाला परत केले असणे, सदर निकृष्ट दर्जाचे मोबाईल पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने करावयाची कारवाई व अंगणवाडी कर्मचाऱ्यांना चांगल्या दर्जाचे मोबाईल देणे बाबत घ्यावयाचा निर्णयाबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ५०८४ | १०० | अंगणवाडी सेविका व अन्य कर्मचाऱ्यांना अत्यंत तोकडे मानधन देण्यात येत असणे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी जानेवारी, 2023 मध्ये आंदोलन केल्यानंतर अर्थसंकल्प 2023-24 मध्ये अंगणवाडी सेविकांचे मानधन 8500 वरून 10000 व मदतनीसाचे मानधन 6500 वरून 8000 करण्यात आले असणे, मात्र सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात दिलेल्या एका निकालानुसार सदर कर्मचाऱ्यांना वैधानिक दर्जा देऊन त्यांना किमान वेतन देण्याची होत असलेली मागणी, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना महागाईच्याआ काळात किमान प्रतिमहिना 15 हजार रुपये मानधन देण्याची निकड असणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (१५) | ५०४४ | १० | राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येते. त्यासाठी तांदूळ, कडधान्य, मीठ, मसाला, मोहरी, जिरे, हळद आदी वस्तूंचा पुरवठा करण्यात येतो. तर इंधन, भाजीपाला व पूरक आहारासाठी प्रतिविद्यार्थी अनुदान वितरित करण्यात असून त्यासाठी सुधारित अनुदानात प्रमाणात वाढ करण्यात आली असून स्वयंपाकी व मदतनीस यांना अजूनही अल्प मानधन दिले जात असणे , राज्यभरात दोन लाखांवर स्वयंपाकी व मदतनीस असून त्यांचे काम पाहता हे मानधन अतिशय तोकडे असल्याने स्वयंपाकी व मदतनीस मानधन वाढीच्या प्रतीक्षेत असणे जिल्हा परिषद तसेच शासनमान्य शाळेमधील कार्यरत स्वयंपाकी मदतनिसांच्या मानधनात वाढ करण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१६) | ५०८९ | १० | ”राज्यात सन २०१४ रोजी अंगणवाडी सेविका, मदतनिसांना सेवानिवृत्तीचा लाभ देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला, परंतु जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागातून सेवा दिलेल्या अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना अद्यापपर्यंत सेवानिवृत्तीच्या लाभ मिळाला नसल्याचे माहे जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असणे, सध्या जिल्हा परिषदेतून मुंबई येथील महिला व बालकल्याण विभागाच्या आयुक्त कार्यालयात ३९० प्रस्ताव अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे उघडकीस येणे, सदरील अंगणवाडी सेविका, मदतनिसांना सेवानिवृत्तीचा लाभ मिळत नसल्याने ते आर्थिक संकटात सापडले असल्याने त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने या कर्मचाऱ्यांना त्वरीत लाभ मिळण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १५ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महिला व बालविकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई